६

# बीड जिल्हयात शिक्षणाधिकार कायदा २००९ ची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना शिक्षकांना येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास

**वसुदेव विक्रम राऊत**
पीएच.डी. संशोधन शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## प्रास्ताविक

शिक्षणाधिकार कायदा २००९ ची प्रत्यक्ष अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रथमच होत आहे. त्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या समोर फार मोठी आव्हाने आहेत. ही आव्हाने पेलण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच शिक्षकाला अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करता येणे अत्यावश्यक बाब आहे.

शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार शिक्षकांना सामान्य बालकांसोबतच विशेष बालके व अपंगत्व असणारी बालके, शिक्षणापासून वंचित राहीलेली बालके व स्थलांतरित बालके यांना सुद्धा शिक्षण दयावे लागणार आहे. अशी विविध आव्हाने शिक्षणाधिकार कायदा २००९ मुळे शिक्षकांसमोर उभी आहेत. या आव्हानांचा अभ्यास प्रस्तूत संशोधनात करण्यात येणार आहे.

## संशोधन समस्येची गरज

१. शिक्षणाधिकार कायदा २००९ ची अंमलबजावणी करतांना शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधी ज्या अडचणी येतील, त्या सर्वांसमोर आणण्यास मदत होईल.

२. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार सरकारी व खाजगी शाळांत २० टक्के प्रवेश मागसवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत देणे बंधनकारक आहे याची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यत पोहोचण्यास मदत होईल.

३. शिक्षणाधिकार कायदा २००९ ची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना शिक्षकांना येणाऱ्या अडचणींची व त्रुटींची माहिती मिळण्यास मदत होईल.

४. शिक्षकांना कोणत्या बाबींचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. याची माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल.



Vol: 6th, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

**संशोधन समस्येचे महत्त्व**

१. शिक्षणाधिकार कायदा २००९, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रथमच अंमलबजावणीत येत असल्याने शिक्षकांना येणाऱ्या समस्या सर्वासमोर येतील

२. प्रस्तूत संशोधनामूळे शिक्षकांसमोरीत आव्हाने सोडवण्यास मदत होईल.

३. प्रस्तूत संशोधनामूळे विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना येणाऱ्या अडचणी समोर येतील व त्यावर उपाययोजना सुचविता येतील.

४. प्रस्तूत संशोधनामूळे जास्तीत जास्त मुले शिक्षणाच्या प्रवाहात येतील.

५. प्रस्तूत संशोधनामूळे शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या तरतुदीनुसार शाळेत विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात का? याची माहिती मिळेल.

**समस्येचे शीर्षक**

बीड जिल्हयात शिक्षणाधिकार कायदा २००९ ची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना शिक्षकांना येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास

पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

१. बीड जिल्हा- मराठवाडा विभागातील क्षेत्रफळाने विस्तृत असणारा व ऊसतोड कामगारांचा म्हणून ओळखला जाणारा जिल्हा.

२. शिक्षणाधिकार कायदा २००९ -६ ते १४ वयोगटांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण करणारा व खाजगी शाळांना २५ टक्के मागासवर्गीय मुलांना मोफत प्रवेश मिळवून देणारा कायदा.

३. अंमलबजावणी-कायदयाची प्रत्यक्ष कार्यवाही.

४. शिक्षकांना येणारी आव्हाने- शिक्षणाधिकार कायदा २००९ ची अंमलबजावणी करताना शिक्षकांना येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश विषयक, अध्यापन विषयक, प्रशिक्षण विषयक, शैक्षणिक पात्रतेविषयी असणाऱ्या समस्या.

**संशोधनाची गृहीतके**

१. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती उपलब्ध होत नाही.

२. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार शालेय शिक्षकांना पर्याप्त पदवी पाच वर्षाच्या आत प्राप्त करावी लागते.

३. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार खाजगी शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत दिले जातात.

४ . शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार वयाच्या अधिकृत पुराव्याचे कागदपत्र देईपर्यंत मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो .

**संशोधनाची उद्दिष्टे**

१ . शिक्षणाधिकार कायदा २००९ चे स्वरूप जाणून घेणे .

२ . शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप जाणून घेणे .

३ . शिक्षणाधिकार कायदा २००९ ची अंमलबजावणी करतांना शिक्षकांना येणाऱ्या आव्हानांची माहिती मिळविणे .

४ . शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार शिक्षकांना येणाऱ्या समस्या जाणून घेणे .

५ . शिक्षणाधिकार कायदा २००९ मधील त्रुटी जाणून घेणे .

६ . शिक्षणाधिकार कायदा २००९ विषयी शिफारशी सूचविणे .

**संशोधनाची परिकल्पना**

१ . शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार वयाचा पुरावा नसलेल्या मुलांना शाळेत प्रवेश देणे जिकीरीचे काम आहे .

२ . शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार स्थतांतरीत बालकांना वर्षभर कधीही शाळेत प्रवेश दिला जातो .

३ . शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार शिक्षणापासून वंचित राहिलेल्या १४ वर्ष वयापर्यंतच्या बालकांना त्यांच्या वर्यागटानुसार इयत्तेत प्रवेश दिला जातो .

४ . प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्याता नापास केले जात नाही .

५ . विद्यार्थ्यांचे वर्षभर सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन केले जाते .

६ . शिक्षणाधिकार कायदा २००९ ची अंमलबजावणी शिक्षकांसाठी आव्हानात्मक आहे .

**संशोधनाची व्याप्ती**

१ . क्षेत्र व्याप्ती– प्रस्तुत संशोधनाकरीता संपुर्ण बीड जिल्हयातील प्राथमिक शाळा ही क्षेत्र व्याप्ती आहे .

२ . घटक व्याप्ती– प्रस्तुत संशोधन प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांमधीत शिक्षकांशी संबंधित आहे .

३ . आशय व्याप्ती– प्रस्तुत संशोधन शिक्षणाधिकार कायदा २००९ ची अंमलबजावणी करतांना शिक्षकांना येणाऱ्या आव्हानांशी संबंधित आहे .

४ . काल व्याप्ती– प्रस्तुत संशोधन साधारणत: २०१३–१४ य कालखंडा इतके व्याप्त आहे .



Vol: 6th , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

**प्रस्तुत संशोधनाची पध्दती**

सदरील संशोधन हे वर्तमानकालीन समस्येशी निगडीत असाल्याने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. "बीड जिल्हयात शिक्षणाधिकार कायदा २००९ ची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांन शिक्षकांना येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास" या समस्येचे सर्वेक्षण पध्दतीने योग्य मूल्यमापन आणि संशोधन करता येते. म्हणून संशोधनकाने ही पध्दनी निवडली आहे.

प्रस्तुत संशोधनाची न्यादर्शनिवड पध्दती

बीड जिल्हयातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने व संशोधन क्षेत्र विस्तृत स्वरूपात असल्याने संशोधनकाने असंभाव्यतेवर आधारीत सहेतूक नमुना निवड पध्दती वापरली आहे.

**प्रस्तुत संशोधन साधने**

**प्रश्नावली**

प्रश्नावली ही प्रश्नांची एक पुर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली मालिका असते. संशोधनात प्रश्नावली या तंत्रास अनन्यसाधारअ महत्व आहे. कमीत कमी काल मर्यादेमध्ये विस्तृत क्षेत्रामध्ये पसरलेल्या जनसमुहाची मते मिळवण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करणे अतिशय महत्वाचे आहे.

लिखित स्वरूपात दिलेला प्रतिसाद म्हणजे प्रश्नावली होय सामान्यपणे प्रश्नावली म्हणजे प्रश्नांची उत्तरे प्राप्त करून घेण्याची पद्धती असून तिच्यात प्रश्न पत्रिकेचा उपयोग केला जातो. त्या प्रश्नांची उत्तरे उत्तरदात्याने द्यावयाची असतात.

**प्रमुख निष्कर्ष**

१. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार खाजगी शाळांचे २५ टक्के प्रवेश मागास विद्यार्थ्यांना मोफत दिले जातात.

२. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार शिक्षणाचा खर्च केंद्र सरकार करते.

३. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार, विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी वयाच्या पूरावा सादर करण्याच्या कालवधी वंधन नाही.

४. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार, विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी वयाचा पूरावा सादर बंधनकारक नाही.

५. शिक्षणाधिकार कायदा २००९ नुसार,च्या अंमलबजावणी मध्ये वयाचे पुरावे, वर्षभर प्रवेश, शाळा बदल अशी विविध आव्हान येतात.



Vol: 6th, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

६ . शिक्षणापासून वंचित बालकांना वयोगटानुसार इयत्तेत प्रवेश देणे हे आव्हाण आहे .

७ . शिक्षणापासून वंचित बालकाला वयानुसार प्रवेश दिल्याने समायोजन व अध्ययनविषयक अडथळे येतात .

८ . बालकांना वयाच्या पुराव्या अभावी प्रवेश देण्या संदर्भात कडक नियम नाहीत .

९ . शाळा बदलामूळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीविषयक, शैक्षणिक प्रगती विषयक, समायोजन विषयक अडचणी येतात .

१० . सर्व शिक्षकांच्या मते, विशेष बालकांना सामान्य शाळेत प्रवेश दिला जातो .

११ . विशेष बालकांच्या अध्यापनासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात नाही .

१२ . शिक्षणाची समान संधी उपलब्ध व्हावी म्हणून वंचित व दूर्बल घटकांना राखीव जागा ठेवण्यात येत आहे .

१३ . सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनात विद्यार्थ्यांची अनुपस्थिती, उदासिनता, स्थलांतर व विशेष बालके या अडचणी येतात

१४ . शाळा व्यवस्थापन समितीच्या स्थानिक राजकारणातून आर्थिक फायदयांसाठी शालेय कामकाजामध्ये अडथळे आणले जातात .

१५ . शिक्षक दूर्बल व वंचित घटकांतील बालकांना शाळेत आणण्यासाठी विविध उपक्रम राबवतात .

१६ . शिक्षणाधिकार कायदा २००९ मूळे शिक्षणापासून वंचित अनेक बालके शाळेत प्रवेशीत झाली आहेत .

१७ . शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या संपूर्ण बाबीची अंमलबजावणी होत नसल्याने यात त्रुटी आहेत .

१८ . सर्व शिक्षकांच्या मते, शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या अंमलबजावणी बदल आवश्यक आहेत .

१९ . शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या अंमलबजावणी योग्य प्रशासन व नियंत्रणाचा अभाव आहे .

२० . शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या अंमलबजावणी योग्य प्रशासकीय सुसूत्रता नाही .

**शिफारशी**

१ . बालकाच्या वयाचे पूरावे उपलब्ध करण्याची व्यवस्था करण्यात यावी .

२ . विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑन लाईन करण्यात द्यावेत .

३ . विद्यार्थ्यांच्या स्थलांतराच्या संदर्भात त्याच्या पूर्वीच्या शाळेतील प्रगती व मूल्यमापनाच्या सर्व नोंदी नवीन शाळेस मिळण्याची व्यवस्था करावी .

४ . १४ वर्ष वय पूर्ण झालेल्या परंतू शिक्षणापासून वंचित बालकांना स्वतंत्र शाळांची व्यवस्था करण्यात यावी .

१. द्यायानुसार इयत्तेत प्रवेश दिल्यावर विद्यार्थ्याला आवश्यक पूर्वज्ञान प्राप्त करून देण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

२. बालकांच्या वयाच्या पूराव्या संबंधी कडक नियम करावे.

३. विद्यार्थ्यांची उपस्थिती व शैक्षणिक प्रगती या बाबींवर भर द्यावा.

४. विशेष बालकांना अध्यापन करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

५. सातत्यपूर्व सर्वकष मूल्यमापनात मापन केल्या जाणाऱ्या सर्व बाबींचा विकास घडवण्यावर भर दयावा. जेणे करून शिक्षकांना कागदोपत्री मूल्यमापन दाखवावे लागणार नाही.

६. शाळा व्यवस्थापन समित्या स्थानिक राजकारणापासून अलिप्त ठेवण्यासाठी नियम करावे.

७. शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या प्रचारासाठी प्रसारमाध्यमांचा मोठया प्रमाणात वापर करावा.

८. शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर कराव्यात.

९. अधिकारी वर्गावर योग्य नियंत्रणाची व्यवस्था करावी.

१०. शिक्षणाधिकार कायदा २००९ च्या अंमलवजावणीत सुसूत्रता आणावी.

संदर्भग्रंथ सूची

१. शेटकर, डॉ. घ. वि. व जोशी डॉ शोभना व्ही २००७, कृती संशोधन व नवोपक्रप, औरंगाबाद. मृण्यमी प्रकाशन

२. बाबट, डॉ. भा. गो. शैक्षणिक संशोधन पुणे: नित्यनूतन प्रकाशन बी/६/१ रक्षालेखा सोसायटी, दत्तवाडी, पुणे ३०

३. घोरमोडे डॉ. के.यु. व घोरमोडे डॉ. खला २००८ शैक्षणिक संशोधनाक्षीमुलतत्त्वे (प्रथम आवृत्ती) नागपूर, विद्या प्रकाशन

४. भिंताडे, वि. व (सप्टेंबर २०११), (चौथी आवृत्ती), पुणे:नित्य नुतन प्रकाशन

५. पंडीत, व. वि. (२०१०, फेबुवारी) (प्रथम आवृत्ती) पुणे:नित्य नुतन प्रकाशन

६. मुख्याध्यापक मार्गदर्शिका भाग २ (प्रथम आवृत्ती, २०१३ फेबुवारी ) पुणे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

७. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था औरंगाबाद, औरंगाबाद–साकार मुद्रणालय, प्रथम आवृत्ती–जुलै २०१०



Vol: 6th, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

८. लोकचेतना अभियान, पूरक वाचन साहित्य, सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन प्रथम आवृत्ती–फेबुवारी २०११
९. ज्ञानगंगा: परिक्षा पद्धती विशेषांक ५ सप्टेंबर शिक्षण दिन संपादक : योगेश विनायकराव पाटील ५ सप्टेंबर २०१० वर्ष १० वे अंक ५ औरंगाबाद.
10. University News- A Weekly Journal of Higher Education, Association of Indian Universities (2010, November 22-28). Vol-48. ISSN-0566-2257. New Delhi
11. www.npc.nc.in
12. www.rte2009.com
13. www.maharashtra.gov.in
14. www.meritnation.com
15.www.articles.timesofindia.indiatimes.com
16.www.educationworldonline.net

...